# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचा: १. शासन निर्णय वित्त विभाग क्र. रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दि. ३१.०३.२०२३
२. महा. शासन वित्त विभाग, शा.निर्णय क्र. सेनिवे-२०२४/प्र.क्र./५४/सेवा-४, दि. २०.०९.२०२४.
३. महा. शासन वित्त विभाग शा.नि. क्र. सेनिवे २०२४/प्र.क्र..५४/सेवा-४, दि. ३०.०३.२०२६
४. महा. शासन वित्त विभाग शा. परी. क्र. रानियो-२०२६/प्र.क्र..३३/सेवा-४, दि. ०६.०५.२०२६.

## प रि प त्र क

क्र.बीजीए/पेन्शन/सु.एनपीएस/०७/२०२६/1972 दिनांक:- १२ ऑगस्ट २०२६

या विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की,

उपरोक्त संदर्भ क्र. ०२ अन्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागु असलेल्या विद्यापीठातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना दि. ०१.०३.२०२४ पासुन अनुज्ञेय राहील.

तसेच उपरोक्त संदर्भ क्र. ०३ अन्वये राज्य शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी पात्र व इच्छुक असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी द्यावयाचा विकल्प दि. ३१.१२.२०२६ पर्यंत संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांचेकडे सादर करण्यात यावा.

जे अधिकारी/कर्मचारी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन (RNPS) योजनेअंतर्गत सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठीचा विकल्प देतील/स्वीकारतील त्यांनाच सदर योजना सेवानिवृत्तीनंतर लागु राहील.

आता संदर्भ क्र. ०४ नुसार सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

१. **निवृत्तीवेतन** - राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीतील नियतवयोमानानुसार निवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी यांनी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प दिल्यास, अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांची २० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५० % निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ अनुज्ञेय राहील. तथापि अधिकारी/कर्मचाऱ्यांची २० वर्षापेक्षा कमी व १० वर्षापेक्षा जास्त सेवा होऊन तो नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यास त्याला त्याच्या शेवटच्या वेतनाच्या आधारे त्याच्या सेवेच्या प्रमाणात (अहर्ताकारी सेवा) निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहील.

२. (अ) या योजनेअंतर्गत किमान १० वर्षाच्या सेवेनंतर नियमवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यावर किमान निवृत्तीवेतन रू. ७,५००/- इतके राहील.

(ब) दहा वर्षापेक्षा कमी सेवा असल्यास या योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही.

३. <u>कुटुंबनिवृत्तीवेतन</u> -

निवृत्तीवेतनाच्या ६० % इतके कुटुंबनिवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ अनुज्ञेय राहील.

४. सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना स्वीकारलेले अधिकारी/कर्मचारी यांच्या नियत वयोमानानुसार निवृत्तीच्या वेळी त्यांनी त्यांच्या (**PFRDA**) यांच्याकडे जमा झालेल्या अंशदानाच्या संचित निधीमधुन प्राप्त होणाऱ्या ६० % परताव्याची रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे जमा करावी. आहरण व संवितरण अधिकारी यांनी अशा जमा झालेल्या रक्कमा निश्चित करण्यात येणाऱ्या लेखाशिर्षाखाली चलनाद्वारे शासनास भरणा कराव्यात.

५. दि. ०१ मार्च २०२४ ते या शासन परीपत्रकाच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प स्वीकारलेला आहे, अशा अधिकारी/कर्मचारी यांनी देखील निवृत्तीच्या वेळी (**PFRDA**) यांचेकडे जमा असलेल्या अंशदानाच्या संचित निधीमधुन प्राप्त झालेल्या ६० % परताव्याची रक्कम आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे जमा करावी. आहरण व संवितरण अधिकारी यांनी अशा जमा झालेल्या रक्कमा निश्चित करण्यात येणाऱ्या लेखाशिर्षाखाली चलनाद्वारे शासनास भरणा कराव्यात.

६. तसेच उपरोक्त नमुद मुद्दा क्र. ४ व ५ मधील अधिकारी/कर्मचारी यांनी ४० % संचित निधीवर **Annuity Service Provider** कडुन प्राप्त होणाऱ्या वार्षिकीचा (**Annuity**) तपशील संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना सादर करावा. आहरण व संवितरण अधिकारी यांनी **<u>सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत अनुज्ञेय निवृत्तीवेतन व त्यावरील महागाई वाढ या रक्कमेमधुन वार्षिकीची (Annuity) रक्कम वजा करून वित्त विभागाकडुन देय निवृत्तीवेतन निश्चित करावे.</u>**

७. **<u>सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प स्वीकारलेल्या अधिकारी/कर्मचारी</u>** यांनी **<u>राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीअंतर्गत जमा झालेल्या संचित निधीमधुन कोणत्याही प्रकारची यापुर्वी काढलेली रक्कम १० % व्याजासह भरणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन त्या प्रमाणात अनुज्ञेय ठरेल.</u>**

..३/

<u>ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतनाचे कर्मचारी हिस्स्यामधील २५ % आगाऊ रक्कम (Advance) घेतलेली आहे, त्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी विकल्प (Option Form) भरतांना घेतलेली आगाऊ रक्कम १० % व्याजासह जमा करावी अन्यथा त्यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन त्या प्रमाणात अनुज्ञेय ठरेल.</u>

८. राजीनामा दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन अनुज्ञेय राहणार नाही, फक्त राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीअंतर्गत सर्व लाभ अनुज्ञेय राहतील.

९. सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना स्वीकारलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना शासन निर्णय वित्त विभाग क्र. रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दि. ३१.०३.२०२३ नुसार सेवानिवृत्तीउपदान लागु राहील.

वरील निर्णयानुसार प्रदान करण्यात येणाऱ्या सेवाउपदान व मृत्युउपदानाच्या प्रयोजनार्थ सद्यस्थितीत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतुदी लागु राहतील.

१०. सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनाअंतर्गत सेवाकालावधीची गणना ही सभासदाने प्रत्यक्ष भरलेल्या अंशदानाशी (वर्गणीशी) निगडीत असेल. ज्या कालावधीसाठी सभासदाने अंशदान भरलेले नसेल तर वरील प्रयोजनार्थ तो कालावधी सेवाकालावधी म्हणुन गणण्यात येणार नाही. अधिकारी/कर्मचाऱ्यांची ज्या कालावधीचे अंशदान त्यांच्या वेतनातुन कपात करण्यात आलेले नाही असे अंशदान भविष्यात अधिकारी/कर्मचाऱ्याने व्याजासह भरल्यास तो कालावधी वरील प्रयोजनार्थ सेवाकालावधी म्हणुन गणण्यात येईल.

११. <u>सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प दिलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना यापुढे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणालीअंतर्गत असलेल्या संचित निधीमधुन कोणत्याही प्रयोजनार्थ रक्कम काढण्यास मुभा असणार नाही. तसेच सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागु झाल्यापासुन राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत जमा झालेल्या संचित निधीमधुन कोणत्याही प्रकारची यापुर्वी काढलेली रक्कम १० % व्याजासह भरणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना निवृत्तीवेतन त्या प्रमाणात अनुज्ञेय ठरेल.</u>

१२. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सेवानिवृत अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निश्चित केलेले निवृत्तीवेतन अदा करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती स्वतंत्रपणे निर्गमित करण्याबाबत संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

..४/

तेव्हा संदर्भिय दि. २०.०९.२०२४ व दि. ०६.०५.२०२६ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार तसेच नमुद शर्ती व अटीच्या अधिन राहुन राज्य शासनाच्या सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी (RNPS) पात्र व इच्छुक असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी द्यावयाचा एक वेळचा विकल्प **(One Time Option)** दि. **३१.१२.२०२६ पर्यंत संबंधित कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांचेकडे सादर करण्यात यावा. विकल्पाचा नमुना सदर परीपत्रकासोबत जोडण्यात येत आहे.**

सदर परीपत्रकाचे प्रारूप नियंत्रक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे मार्फत मा. कुलगुरू महोदय यांचेकडे सादर करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

मा.कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**प्रतः- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रण अधिकारी,(सर्व)----------------------------------------------------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व ---------------------------------------------------------------------------------------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

(signature)
उपकुलसचिव(आस्था)
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

# विकल्प

**शासन निर्णय, वित्त विभाग सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दिनांक.** ०६.०५.२०२६

राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली लागु असलेल्या शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (**RNPS**) लागु करणेबाबत.

**उपरोक्त शासन निर्णयानुसार दिनांक ०१.०३.२०२४ पासुन**

१. मी खालील सही करणार/करणारी ---------------------------------------------पद--------------------- याद्वारे आपणास कळवू इच्छितो/इच्छिते की, दिनांक ----------------- पासून मला राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (**RNPS**) लागु करावी.

किंवा

२. मी खालील सही करणार/करणारी ---------------------------------------------पद--------------------- याद्वारे आपणास कळवू इच्छितो/इच्छिते की, दिनांक ----------------- पासून मला सद्यस्थितीतील राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली योजनाच लागु करावी. (**NPS**)

दिनांक :-

स्थळ :-

अधिकारी/कर्मचारी यांची सही/अंगठा

नांवः-

पदनामः-

**PRAN No.** :-

सेवार्थ **ID** :-

विकल्प स्विकारला -

कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांची सही व शिक्का

..१/-

**संदर्भ :- शासन निर्णय, वित्त विभाग सेनिवे-२०२४/प्र.क्र.५४/सेवा-४, दिनांक. ०६.०५.२०२६**

**ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय निवृत्तीवेतनाचे कर्मचारी हिस्स्यामधील २५ % आगाऊ रक्कम (Advance) घेतलेली आहे व राज्य शासनाची सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (RNPS) स्विकारून त्याअंतर्गत विकल्प भरून देतांना अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांनी विकल्पासोबत खालीलप्रमाणे वचनपत्र कार्यालयास सादर करावे.**

## वचनपत्र

मी खालील सही करणार/करणारी ------------------------------------------पद--------------------- याद्वारे लिहुन देतो/देते की राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत जमा झालेल्या संचित निधीतुन कर्मचारी हिस्स्यातील २५ % आगाऊ रक्कम (Advance) रू.--------------/- इतकी व त्यावरील व्याजाची रक्कम रू.------------/- अशी एकुण रक्कम रू. --------------/- एकरक्कमी स्वरूपात माहे ----------------मध्ये परतफेड करीत आहे.

दिनांक :-

स्थळ :-

अधिकारी/कर्मचारी यांची सही/अंगठा

नांव:-

पदनाम:-

**PRAN No.** :-

सेवार्थ **ID** :-

कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांची सही व शिक्का